ePaper

║ वर्ष - 8 । अंक - 18 ║ UDYAM-MH-26-0158827 ║

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ║ मंगळवार, दिनांक 23 जुलै 2024 ║ पुणे आवृत्ती ║ mahaenews.com ║ maha_enews ║ Mahaenews

# ठरलं! मनसेही विधानसभा निवडणूक लढवणार!



## आतील पानांत


- जडेजाला टीम इंडियातून डच्चू?
- सरकारने खेळाडूंवर किती केला खर्च?
- नेमप्लेट लावण्याच्या निर्णयाला स्थगिती
- कमला हॅरिस जिंकण्याची शक्यता


## विवाहित प्रेयसीचा गर्भपात करताना मृत्यू; तिच्या दोन्ही मुलांनाही टाकले नदीपात्रात

# तिहेरी हत्याकांडाने मावळ तालुका हादरला!

## तळेगाव एमआयडीसी पोलिसांकडून दोन आरोपिंनाअटक केली आहे

**। तळगाव ।महाइन्यूज**

**अनैतिक संबंधातून राहिलेला गर्भ नष्ट करण्यासाठी गर्भपात करत असताना एका युवतीचा मृत्यू झाला. ज्या इसमामुळे ती महिला गरोदर राहिली त्या इसमाने तिचा मृतदेह नष्ट करण्याच्या हेतूने इंद्रायणी नदीत फेकून दिला. यावेळी त्या महिलेच्या दोन लहान मुलांनी आरडाओरडा केला. त्यांचा आवाज गप्प करण्यासाठी त्या लहानग्यांना देखील त्या नराधमाने जीवंत नदीत फेकून दिले. याबाबत मृत महिलेल्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीमुळे हे तिहेरी हत्याकांड उघडकीस आले.या प्रकरणी  चार जणांवर गुन्हा दाखल झाला  असून दोन आरोपींना अटक केली आहे.**



समरिन निसार नेवरेकर वय 25, इशांत निसार नेवरेकर वय 5 वर्षे, इजान निसार नेवरेकर वय 2 वर्षे अशी मृतांची नावे आहेत.  या प्रकरणी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर वय 37 रा.वराळे ता.मावळ, रविकांत भानूदास गायकवाड वय 41 रा.डॉन बास्को कॉलनी सावेडी ता.अहमदनगर अशी अटक केलेल्यांची नावे असून यातील गर्भपात करणारी महिला व संबधीत डॉक्टर ला ताब्यात घेण्यासाठी पोलिस पथक रवाना झाले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर वय - ३७ वर्षे रा. समता कॉलनी वराळे ता. मावळ जि. पुणे, रविकांत भानुदास गायकवाड वय-४१ वर्षे रा. डॉन बास्को कॉलनी ईश्वरानंद सोसायटी, सावेडी ता. जि. अहमदनगर यांनी संगनमत करुन फिर्यादी गुलाम कादीर महदहमिफ यांची मयत मुलगी समरीन निसार नेवरकर (वय २५) वर्षे, ही आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर याच्यापासून अनैतिक संबंधातून गरोदर राहिल्याने तिचा गर्भपात करण्यासाठी तिला कळंबोल येथे अमर हॉस्पीटल येथे दाखल केले.

तेथे तिचा गर्भपात करत असताना तेथील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या हालगर्जीपणामुळे उपचारादरम्यान समरीन मृत पावली. याबाबत तेथील डॉक्टरांनी पोलीसांना माहीती देणे आवश्य होते. मात्र तसे त्यांनी न करता मृतदेह रविकांत भानुसदा गायकवाड, बुधवंत नामक महिलेच्या ताब्यात दिला. त्यानंतर आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर, रविकांत भानुदास गायकवाड या दोघांनी पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने समरन नेवरेकरकच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तळेगावकडून चाकणकडे जाणारे दिशेला इंदोरी गावच्या बाजून जाणाऱ्या रोडवरील इंद्रायण नदीच्या पुलावरुन वाहत्या नदी पात्रात फेकुन दिला. सोबत तिचा मुलगा इशांत निसार नेवरेकर वय (५ वर्षे) इजान निसार नेवरेकर (वय २) वर्षे या दोन्ही मुलांना इंद्रायणी नदी पात्रात जिवंत फेकून दिले. ही घटना 6 ते 9 जुलै दरम्यान घडली आहे.

### यांनी आणला गुन्हा उघडकीस...

याप्रकरणी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर, रविकांत भानुदास गायकवाड यांना अटक करण्यात आली आहे. गर्भपात करण्यास सहाय्य करणारी बुधवंत नामक महिला तसेच कळंबोली येथील अमर हॉस्पिटलमधील डॉक्टर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत महिला हरविली असल्याची तक्रारदेखील तळेगाव एमआयडीसी पोलिसांत दाखल करण्यात आली होती. अधिक तपास एमआयडीसी पोलीस करीत आहेत. सहाय्यक पोलिस आयुक्त देवीदास घेवारे यांनी  घटनास्थळी भेट दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंकुश बांगर, सहाय्यक पोलिस निरीक्षक शाम मस्के, उपनिरीक्षक सीताराम पुणेकर, अनील भोसले हवलदार भवारी यांनी गुन्हा उघडकीस आणला.

# शरद पवार आणि अजितदादांनी एकत्र यावं!

## मात्र हे स्वप्न एक महत्वकांक्षी नेता पूर्ण होऊ देणार नाहीः आमदार सुनील शेळके

**। वडगांव मावळ । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटीला आता अनेक महिने उलटले आहेत. याबबातची सुनावणी निवडणूक आयोगासह सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. मात्र, अनेकदा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार आणि जेष्ठ नेते शरद पवार एकत्रित यावे असं अनेक नेते म्हणतात. अशातच शरद पवार आणि अजित पवार एकत्र येतील अशी चर्चा कार्यकर्त्यांमधून आता थेट आमदारांमध्ये देखील सुरू झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.कालपासून (शनिवारी) अजित पवार यांच्या आमदारांनी शरद पवार आणि अजित पवार एकत्र येण्याचा सूर आवळला आहे. या दोन्ही नेत्यांनी एकत्र यावं अशीच भावना आमदारांनी व्यक्त केली आहे.



अशातच या नेत्यांना एकत्र आणण्याचं स्वप्न एक महत्त्वाकांक्षी नेता पुर्ण होऊ देणार नाही असं म्हणत अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनी शरद पवार-अजित पवारांच्या एकत्रित येण्यावर प्रतिक्रिया दिली आहे.

### तो महत्त्वकांक्षी नेता कोण?

राज्याच्या राजकारणातील सर्व घडामोडी पाहता आज कोण कोणत्या पक्षांमध्ये जाईल आणि कोणाशी युती होईल याचा काही विश्वास आणि ताळमेळ राहिलेला नाही. भविष्य काळात अजित पवार आणि शरद पवारांनी एकत्रित यावं असं आमच्यासारख्या कार्यकर्त्याला देखील वाटतं. ते दोघे एकत्र आले तर आम्हाला आंनदच असेल पण हे स्वप्न काही महत्त्वकांक्षी नेता पुर्ण होऊ देणार नाही असं अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनी म्हटलं आहे. तर तो महत्त्वकांक्षी नेता कोण आहे, शेळकेंचा रोख कोणाकडे आहे अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# शिवसेना ठाकरे गटाचा पुण्यात मेळावा!

## ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात निवडणूक होण्याची शक्यता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मेळावा येत्या तीन ऑगस्ट रोजी होणार आहे. या निमित्ताने या पक्षाकडून निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे.**



आगामी विधानसभा निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी तयारी आणि इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांवर महाविकास आघाडी आणि महायुतीकडून दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. पक्षपातळीवर बैठका, संघटनात्मक बांधणीबरोबरच मेळावे सुरू झाले असतानाच शिवसेनेकडूनही विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे.विधानसभा निवडणुकीसाठी कसबा, हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेकडून दावा करण्यात आला आहे. यातील हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे माजी आमदार आहेत. त्याचबरोबर कसबा विधानसभा मतदारसंघातही शिवसेनेची ताकत आहे. या पार्श्वभूमीवर या मेळाव्यात या तिन्ही मतदारसंघांतील इच्छुकांकडून जोरदार शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता आहे.उद्धव ठाकरे यांच्याबरोबरच खासदार, प्रवक्ते संजय राऊत, जिल्हा संपर्कप्रमुख सचिन अहिर आणि आमदार भास्कर जाधव गटप्रमुखांना मार्गदर्शन करणार आहेत. आगामी विधानसभा निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी तयारी आणि इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांवर महाविकास आघाडी आणि महायुतीकडून दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. पक्षपातळीवर बैठका, संघटनात्मक बांधणीबरोबरच मेळावे सुरू झाले असतानाच शिवसेनेकडूनही विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे.विधानसभा निवडणुकीसाठी कसबा, हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेकडून दावा करण्यात आला आहे. यातील हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे माजी आमदार आहेत. गणेश कला क्रीडा रंगमंच येथे हा मेळावा होण्याची शक्यता आहे. या मेळाव्याच्या दृष्टीने शहर पातळीवर नियोजनही सुरू करण्यात आले आहे. सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली येत्या दोन ते तीन दिवसांत बैठक होणार आहे, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संजय मोरे यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने पुण्यात भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा झाला होता. भाजपच्या मेळाव्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले होते. 'औरंगजेब फॅन क्लब'चे ठाकरे हे अध्यक्ष आहेत, अशी कडवट टीका शहा यांनी केली होती. या पार्श्वभूमीवर ठाकरे पुण्यातील मेळाव्यात या टीकेला काय उत्तर देतात, याबाबत उत्सुकता असणार आहेशिवसेनेकडूनही विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे.विधानसभा निवडणुकीसाठी कसबा, हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेकडून दावा करण्यात आला आहे. यातील हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे माजी आमदार आहेत. त्याचबरोबर कसबा विधानसभा मतदारसंघातही शिवसेनेची ताकत आहे. या पार्श्वभूमीवर या मेळाव्यात या तिन्ही मतदारसंघांतील इच्छुकांकडून जोरदार शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता आहे.

### महायुतीकडून दावे-प्रतिदावे सुरू झाले

उद्धव ठाकरे यांच्याबरोबरच खासदार, प्रवक्ते संजय राऊत, जिल्हा संपर्कप्रमुख सचिन अहिर आणि आमदार भास्कर जाधव गटप्रमुखांना मार्गदर्शन करणार आहेत. आगामी विधानसभा निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी तयारी आणि इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांवर महाविकास आघाडी आणि महायुतीकडून दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत.

# अजित पवारांच्या आमदाराचे भाजपा श्रेष्ठीला पत्र

## शरद पवारांवरील टीकेनंतर विलास लांडे यांनी व्यक्त केली नाराजी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी शरद पवार यांच्यावर टीका केल्यानंतर महायुतीच्या सोबत असलेल्या अजित पवार गटाच्या नेत्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.**



दि-२२-०७-२०२४

ेखरजी बावनकुळे साहेब ,
ीय जनता पार्टी,

ः- आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्यावर होत असलेली टीका थांबविणे बाबत.

य,

सप्रेम नमस्कार रामकृष्ण हरी आपणास विनंती करतो की या पुणे जिल्ह्याचे भूमिपुत्र आणि देशाचे जेष्ठ नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्यावरती होत असलेली टीका हि महाराष्ट्रातील जनतेच्या मनाला न पटणारी आहे. आमचे दैवत व देशाचे जेष्ठ नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्यावर होत असलेली टीका त्वरित थांबविण्यात यावी हि नम्र विनंती.

रामकृष्ण हरी

आपला

पिंपरी-चिंचवडमधील माजी आमदार विलास लांडे यांनी भाजपा पक्षश्रेष्ठीला याबाबत पत्र लिहिलं असून शरद पवारांवरील टीका थांबवण्यात यावी, अशी मागणी या पत्राद्वारे केली आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

भाजपाकडून सातत्याने शरद पवार यांना लक्ष करत त्यांच्यावर जहरी टीका होत असल्याचं पाहायला मिळत आहे. लोकसभेदरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातील जाहीर सभेत शरद पवार हे भटकती आत्मा असल्याचं वक्तव्य केलं होतं. या वक्तव्याचा खरपूस समाचार राष्ट्रवादी शरद पवार गटाने घेतला होता.

त्याचबरोबर हे वक्तव्य अजित पवार यांना देखील पटलेलं नव्हतं. याचा फटका लोकसभेत बसला असल्याचं माजी आमदार विलास लांडे यांनी म्हटल आहे. त्यामुळे अमित शहा यांनी शरद पवारांना भ्रष्टाचाराचा सरदार म्हणणं योग्य नसल्याचे म्हणत त्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

या वक्तव्याचा आगामी विधानसभेवर परिणाम होऊ शकतो, असे देखील त्यांनी अधोरेखित केल आहे.पुन्हा अशा प्रकारे शरद पवारांवर टीका करू नये म्हणून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना माजी आमदार विलास लांडे यांनी पत्र दिले आहे. ते अजित पवारांचे आणि शरद पवारांचे कट्टर समर्थक मानले जातात. शरद पवारांवर टीका केल्याने त्यांचं मन दुखावले आहे.

### पवारांवरील टीका थांबवण्यात यावी

पिंपरी-चिंचवडमधील माजी आमदार विलास लांडे यांनी भाजपा पक्षश्रेष्ठीला याबाबत पत्र लिहिलं असून शरद पवारांवरील टीका थांबवण्यात यावी, अशी मागणी या पत्राद्वारे केली आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.भाजपाकडून सातत्याने शरद पवार यांना लक्ष करत त्यांच्यावर जहरी टीका होत असल्याचं पाहायला मिळत आहे.

## ‘महाईन्यूज’च्या वृत्तामुळे उडाली खळबळ; उबाळे- लांडगे समर्थकांत ‘सोशल वॉर’

# शिवसेनेच्या सुलभा उबाळे ‘चेकमेट’!

## आमदार लांडगे समर्थकांनी दाखवली ‘‘काम बोलता है’’ म्हणत 10 कामे!

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदार संघातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारे विश्लेषन ‘महाईन्यूज’मध्ये “विरोधकांना काम ना धाम... निवडणुकीपुरता रामराम” अशा मथळ्याखाली प्रसिद्ध केले होते. त्याचा आधार घेत शिवसेना ठाकरे गटाच्या सुलभा उबाळे आणि पदाधिकाऱ्यांनी “भोसरीच्या आमदारांनी ठोस काम दाखवावे” असे खुले आव्हान ‘सोशल मीडिया’वर दिले.**

### ‘चाणक्य’ सल्लागाराच्या आततायीपणामुळे उबाळेंचा प्रचार भरकटला?




एखाद्या वस्तुस्थितीदर्शक वृत्ताची दखल घेत त्यावर तात्काळ ‘रिॲक्ट’ झाल्याबद्दल सुलभा उबाळे आणि समर्थकांचे निश्चितच कौतूक व्हायला हवे आहे. मूळात ‘निवडणुकीच्या निमित्ताने विकासाच्या आणि रास्त मुद्दांवर’ सांगोपांग चर्चा व्हावी, अशीच पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा आहे.

### सुलभा उबाळे काय म्हणाल्या आहेत?

‘‘भोसरी विधानसभेच्या विद्यमान आमदारांनी गेल्या दहा वर्षात काय कामे केले असा प्रश्न विरोधकांनी विचारल्याने केवळ ‘दाम पे चर्चा’ करणाऱ्या भोसरीच्या आमदारांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. त्यामुळे विरोधकांना ‘काम ना धाम’ असे म्हणणाऱ्यांनी आमदारांचे एक ठोस काम दाखवावे असे प्रत्युत्तर आता भोसरी विधानसभेतील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिले आहे.’’असे वृत्त शहरातील आघाडीच्या वृत्तवाहिनीवर प्रसिद्ध झाले आहे. 2014 ते 2024 या दहा वर्षातील कालावधीत आमदार साहेब आपण केलेले एक ठोस काम दाखवा असे आव्हानच आता भोसरी विधानसभेतील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आमदार महेश लांडगे यांना दिले आहे. गल्लीबोळातील कामे करायला रस्ते, फुटपाथ करायला नगरसेवक, पालिका प्रशासन सक्षम आहे. तिथे कुदळ आणि फावडा घेऊन आपण जाता. कामाचे क्रेडिट घेता असे देखील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.नदी सुधार, नियमित, व्यवस्थित पाणी पुरवठा, कचरा, उद्योगधंदे, शिक्षण, रोजगार यावर आमदारांनी काम करायला हवे होते असे देखील शिवसेनेने म्हटले आहे.

### लांडगे समर्थकांनी दाखवली 10 कामे...

उबाळे आणि समर्थकांच्या आक्षेपावर आमदार महेश लांडगे समर्थकांनी सोशल मीडियावर रान पेटवले.एक ठोस काम दाखवा म्हणणाऱ्या उबाळे यांना लांडगे समर्थकांनी “काम बोलता है” असे ब्रँडिंग करीत थेट पिंपरी-चिंचवड शहर आणि पिंपरी-चिंचवडकरांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित १० प्रमुख विकासकामे मार्गी लावल्याचे जाहीर करुन टाकले. त्यामध्ये म्हटले आहे की, “काय केले अन् काम दाखवा म्हणणाऱ्यांनो... उघडा डोळे बघा नीट! : 1. शास्तीकर सरसकट संपूर्ण माफ झाला. 2. आंद्रा भामा आसखेड प्रकल्पाचे पाणी शहरात दाखल झाले. 3. महाराष्ट्रातील पहिले संत तुकाराम महाराज संतपीठ सुरू झाले. 4. मोशी कचरा डेपोवरील बफर झोन 100 मीटरपर्यंत कमी झाला. 5. वेस्ट टू एनर्जी : कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प सुरू झाला. 6. नवनगर प्राधिकरण बाधितांचा साडेबाराटक्के परतावा प्रश्न सुटला. 7. पुणे- पिंपरी-चिंचवड मेट्रो : पिंपरी, निगडीपर्यंत मेट्रोला गती मिळाली. 8. पिंपरी-चिंचवडला स्वतंत्र पोलीस आयुक्तालय मिळाले. 9. पिंपरी-चिंचवड न्यायालय उभारणीचे काम सुरू झाले. 10. मोशी येथे पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल होत आहे. अशा १० कामांचा उल्लेख करीत आमदार महेश लांडगे यांना काम दाखवा म्हणणाऱ्यांनी आता आत्मचिंतन करावे..! असा सल्लाही दिला आहे. विशेष म्हणजे, “मंजिल उन्हीं को मिलती है, जिनके सपनों में जान है।” असा दावा करीत आमदार लांडगे समर्थकांनी शिवसेनेच्या सुलभा उबाळे आणि समर्थकांच्या आव्हानातील हवा काढून घेतली आहे.

---

# आता देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सोसायटीवर

## पीएमआरडीएने उभारलेल्या गृहप्रकल्पातील 29 इमारतींच्या सोसायटीची नोंदणी पूर्ण होणार

। पिंपरी-चिंचवड।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) उभारलेल्या सेक्टर बारा या ठिकाणच्या गृहप्रकल्पातील २९ इमारतींच्या सोसायटीची नोंदणी पूर्ण होणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ही प्रक्रिया रखडली होती. ते काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यानंतर सोसायटीचा ताबा सदस्यांकडे जाणार आहे.**






त्यानंतर पीएमआरडी करत असलेल्या देखभाल दुरुस्तीची कामे संपणार आहेत. गेल्या महिन्याभरापूर्वी सेक्टर बारा येथील इमारतींचे देखभाल दुरुस्तीसाठी नियुक्त केलेल्या ठेकेदाराचा करार संपला आहे. त्यानंतर संबंधित सोसायटीचे देखभाल आणि इतर दुरुस्तीसाठी ‘पीएमआरडीए’ने त्याची मुदत वाढवली होती. दरम्यान, येथील २९ इमारतींचे सोसायटी नोंदणी पूर्ण होणार आहे. अंतिम टप्प्यातील काही कागदपत्रे आणि तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर सोसायटीधारकांना त्या संबंधित प्रक्रिया पूर्ण केले जाईल. दरम्यान, त्यापूर्वी सोसायटीतील सदस्यांची समिती स्थापन केली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, या ठिकाणी उभारलेल्या इतर १६ सोसायट्यांची नोंदणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे त्यांची देखभाल आणि इतर कामे ही पीएमआरडीएच्या वतीने करावी लागणार आहेत. परिणामी, त्यासाठी संबंधित ठेकेदाराला आणखी निधी द्यावा लागणार आहे. दरम्यान, इमारतीची गळती वगळता आता सुरक्षारक्षकापासून सफाई कर्मचाऱ्यांपर्यंत सर्व जबाबदारी आता संबंधित सोसायटीधारकांकडे राहणार आहे. जुन्या काही त्रुटी आणि गळती संबंधित कामे त्याचप्रमाणे सोलर पॅनल वगळता इतर खर्च सोसायट्यांना करावा लागणार आहे. त्यामुळे यापूर्वी त्या सोसायटीधारकांसाठी नेमलेल्या ठेकेदारांकडून कामकाज काढून घेणार आहेत.

> “सेक्टर बारा येथील २९ इमारतींचे सोसायटी रजिस्ट्रेशनचे काम सुरू आहे. ते अंतिम टप्प्यात असून, येत्या काही दिवसांतच ती प्रक्रिया पूर्ण होईल.”
>
> **-हिंमतराव खराडे,**
> उपायुक्त, जमीन व मालमत्ता विभाग



## भूमिका

**तंत्रज्ञान आकलन या दोन्हींची सांगड असलेली व्यक्ती गेल्या काही वर्षांपूर्वीपर्यंत संगणकावर 'घरच्या घरी रेकॉर्डिंग-रेकॉर्डिंग' खेळ खेळू शकत होती. पण आता किंचितही संगीतज्ञान नसलेला आणि थोडेसे तंत्रज्ञान आत्मसात करता येऊ शकणारा कुणीही 'घरच्या घरी संगीतकार' बनू शकतो. हवे फक्त शब्द आणि अपेक्षित परिणाम हवा असलेली माहिती 'एआय ॲप'ला देऊ शकण्याची युक्ती.**

# कुणाच्या पोटावर पाय द्याल?



कृत्रिम बुद्धिमत्ता ही अतिजड संकल्पना जगात सर्वांना समजेल इतकी सुकर कुणी केली असेल तर स्टीव्हन स्पीलबर्ग यांनी. 'सुपरटॉइज लास्ट समर लॉन्ग ' या एका कथेवर त्यांनी २००१ साली 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' हा चित्रपट केला होता. अर्थात त्याकाळात चित्रकथेतून 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स'बाबत जो तर्क लढविला गेला, जे अभ्युपगम (हायपोथिसिस) वर्तविण्यात आले, त्यापेक्षा कैक पटींनी ते सरस असल्याचे उघड होते आहे. हॉलीवूडमधील कलाकारांचा 'एआय'विरोधात ऐतिहासिक संप का झाला याची उत्तरे मानवी बुद्धिमत्ता आणि कौशल्ये यांच्यापेक्षा 'एआय' वरचढ होण्यात आहेत. सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध संगीत उत्पादन आणि विक्री करणाऱ्या कंपन्या शेकडो कोटींचा दावा 'एआय'द्वारे 'घरच्या घरीच संगीत' बनविणाऱ्या ॲपवर ठोकत आहेत. या एआयद्वारे संगीत बनविणाऱ्या कंपन्यांनीदेखील संगीत कंपन्यांना उत्तरे देण्यासाठी कंबर कसून तयारी केली आहे.तर दुसरीकडे, यूट्यूब सारखे सुपरिचित माध्यम 'एआय'ची संगीतशेती फुलावी यासाठी अधिकृत कंपन्यांशी करार करीत आहे. ए आर. रेहमान यांच्यासारखा संगीतकार एका गाण्यात दिवंगत कलाकाराचा आवाज मिळविण्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानाची तरफदारी करताना दिसतो. शास्त्रीय संगीतच नाही, तर लोककला,पॉप , पंजाबी ठेक्याचे किंवा अगदीच आधुनिक ढंगाचे गाणे बनविण्यासाठी कुठल्याही व्यक्तीला गाण्याचे शब्द फक्त हवेत. एआय ॲपला ते दिले की गाण्याची चाल, वाद्यांची रचना, गायनातील हरकती, मुखडा -अंतरा यांमधले विभाजन आदी साऱ्या दोन-तीन डझनांवर कलाकारांना लागणाऱ्या गोष्टी केवळ ३० सेकंदात 'एआय ॲप' करून देते. म्हणजे तुमच्याकडे शब्द (जे तुमचे ठेवा किंवा अन्य कुणाच्या काव्यातील) असले, तर मिनिटांत 'सुनो' सारखे ॲप दोन प्रकारची गाणी तुमच्यासमोर हजर करते. एखाद्या गायकाने -वादकाने आयुष्यभर रियाज करून अवगत केलेले तंत्र काही सेकंदांत एआय तुमच्यासमोर आणते. जगभरातील तंत्रस्नेही तरुण या प्रकारातून हयातभर संगीत शिकलेल्या व्यक्तीपेक्षा उत्तम गाणे तयार करून दाखवत आहेत. बाइलच्या ॲपस्टोर्सवर त्यामुळे 'सुनो'सारख्या एआय म्युझिक मेकर्सना मागणी गेल्या काही दिवसांत वाढली आहे.गेल्या महिन्याच्या अखेरीस सोनी म्युझिक, वॉर्नर म्युझिक ग्रुप, युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप या जगभरातील मोठ्या कंपन्यांनी 'सुनो'सह आणखी एका कंपनीविरोधात मोहीम उघडली. त्यांच्यामते ब्रुस स्प्रिंगटिन, मायकेल जॅक्सन, मरिआ कॅरी, अबा यांच्या गाण्यांचा वापर या कंपन्या आपल्या 'एआय ॲप'ला अद्ययावत करण्यासाठी करीत आहे. म्हणजे 'एआय' ॲप्स या लोकप्रिय गायकांचा आवाज-त्यांचे गाण्यातील कसबच उतरवून काढत नाही, तर त्यांच्या मिश्रणातून एक वेगळाच आवाज तयार करून जनसामान्यांना उपलब्ध करून देत आहे. जे गायकांबाबत आहे, तेच वादकांबाबतही या कंपन्या करीत असल्याचे कंपन्यांचे म्हणणे. त्यावर एआय कंपन्यांनी गेल्या आठवड्यात मोठे पाऊल उचलत 'लॅथम ॲण्ड वॉटकिन्स' या महत्त्वाच्या कायदेसंस्थेला आपल्यासाठी लढण्यासाठी नेमले. त्यामुळे पुढल्या काही दिवसांत आंतरराष्ट्रीय पातळीवर या लढाईचे पडसाद उमटणार आहेत. 'सुनो' हे नाव हिंदी वाटत असले, तरी सात महिन्यांपूर्वी म्हणजे २० डिसेंबर २०२३ रोजी त्याचे लोकार्पण अमेरिकेतील चार तंत्रज्ञांनी केले. त्याचे एक कोटी २० लाख वापरकर्ते आज 'घरच्या घरी' संगीतकार बनले आहेत. या घरच्या घरी संगीत करण्याचा मोफत परवानाच जानेवारी-फेब्रुवारीमध्ये कित्येक भारतीय तरुणांनी मिळविला. हे कसे काम करते, आणि त्यातून तुम्ही या एआय ॲपला 'प्रोम्प्ट' म्हणजेच अचूक आज्ञा देण्यात तरबेज झाला.

## प्रासंगिक »

### नवे काश्मीर!

***अनेक कारणांसाठी चिंता वाढवणाऱ्या आहेत. या राज्यातील दहशतवादास आळा घालण्यास येणारे अपयश हा एकच मुद्दा या संदर्भात विचारात घेऊन चालणार नाही.***

दहशतवाद्यांकडून सुरक्षारक्षकांना सातत्याने केले जाणारे लक्ष्य ही यातील सर्वाधिक गंभीर बाब. विशेषत: 'राष्ट्रीय रायफल्स'सारख्या लष्कराच्या अत्यंत प्रशिक्षित आणि या परिसरांतील लढाईचा अनुभव असलेल्या तुकडीतील सैनिक या हल्ल्यांत बळी जात असतील तर ही चिंता अधिकच वाढते. ते गांभीर्य लक्षात यावे यासाठी हा काही तपशील : जम्मू-काश्मिरात २०२२ साली एकूण १५८ दहशतवादी हल्ल्यांतील फक्त तीन घटनांत सुरक्षा यंत्रणांस लक्ष्य केले गेले आणि त्यातून सहा जवानांना मरण आले. नंतर २०२३ साली काहीसे कमी म्हणजे १३४ हल्ले झाले आणि त्यात लष्करावरील हल्ले तीनच राहिले. पण बळी गेलेल्या जवानांची संख्या २१ वर गेली. या पार्श्वभूमीवर यंदाच्या पहिल्या सात महिन्यांतील एकूण ८७ दहशतवादी हल्ल्यांत सुरक्षा दलांवरील हल्ल्यांची संख्या दुप्पट झाली.

ठराविक टापूवर सतत नजर ठेवणारा क्लोज्ड सर्किट टीव्ही (सीसीटीव्ही) कॅमेरा आज समाजाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. गुन्हा घडल्यावर तपासाला आलेल्या पोलीसांकडून सर्वात अगोदर विचारणा होते ती सीसीटीव्ही कॅमेरा बाबत. सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते तेव्हा सुद्धा पोलिसांनी अनेक मोठ्या गुन्ह्यांची उकल केली.

# सीसीटीव्हीच्या नजरकैदेत नागरी स्वातंत्र्य



अगदी चार्ल्स शोभराज असो अथवा रामन राघव असो, साध्या एका छायाचित्रामुळे गुन्हेगार पकडले जात होते. तंत्रज्ञान अद्यावत असूनही गुन्हे कमी झालेले नाहीत, 'एनसीआरबी'चे (राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाचे) अहवाल सुद्धा त्यावर शिक्कामोर्तब करतात. दिल्ली हे भारतात सर्वाधिक सीसीटीव्ही लागलेले शहर म्हणून सीसीटीव्हीची सुद्धा राजधानी आहे. दिल्लीत प्रति चौरस मैल १८२६ सीसीटीव्हींचा जागता पहारा आहे. त्या खालोखाल भारतात हैद्राबाद, इंदूर, चेन्नई ही सर्वाधिक सीसीटीव्ही लागलेली शहरे आहेत. मात्र गुन्ह्यांचे प्रमाण इथे कमी झालेले नाही. सीसीटीव्हीचा मूळ उद्देश साध्य होताना दिसत नाही. याला कारण गुन्हे घडल्यावर पुरावा म्हणून सीसीटीव्हीच्या वापरास प्राधान्य आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे किती गुन्हेगारांना शिक्षा झाली हा संशोधनाचा विषय आहे. परंतु सीसीटीव्हीचा पुरावा असूनही अनेक आरोपींची सुटका झाल्याची शेकडो उदाहरणे आपल्याला मिळतील. खटल्यांचा विचार केल्यास सीसीटीव्हीत कैद झालेला गुन्हेगार अनेकदा तांत्रिक कारणास्तव सुटतो.पुण्यातील नुकताच झालेला दुर्दैवी अपघातात गुन्हा घडल्यावर काही व्हिडिओ समोर आले. आरोपी मुलगा क्लबमध्ये बसून असल्याचे ते व्हिडिओ असल्याचे बोलले गेले. परंतु परिस्थितीजन्य पुराव्याचा विचार केल्यास ते सिद्ध करण्याची जबाबदारी ही तपासयंत्रणेवर असेल. त्यात तपासयंत्रणेस कितपत यश मिळेल हे पुढे स्पष्ट होईलच. गुन्हा घडण्यागोदर सीसीटीव्हींचा हवा तसा उपयोग होत नसल्याचे वास्तव स्वीकारावे लागेल. गुन्हेगारांना सीसीटीव्हीचा दरारा आहे का? याचे उत्तर नकारार्थी येईल. वसई प्रकरणात आरोपीला तो करत असलेले कृत्य सीसीटीव्हीत येईल याचा अंदाज नसेल? अथवा इतरत्र घडणारे अनेक गुन्हे गुन्हेगारांना सीसीटीव्हीचे भय नसल्याचीच साक्ष देतात. अगदी मॉल, दागिन्यांची दुकाने वा सार्वजनिक स्थळी होणारे गुन्हे याची प्रचीती देतात. आपल्या देशात सीसीटीव्ही बाबत एक भेदभाव सुध्दा आढळून येतो तो शहरी आणि ग्रामीण भागात.

सीसीटीव्ही बाबत शहरी भागाला शासकीय स्तरावर झुकते माप देण्यात आल्याचे दिसते. भौगोलिक आणि गुन्ह्यांच्या दृष्टीने अलिप्त आणि कमी वर्दळीच्या ग्रामीण भागात सुध्दा सीसीटीव्हीला प्राधान्य मिळणे तितकेच गरजेचे आहे. जेणेकरून ग्रामीण भागात गुन्हेगारांच्या शिक्षेच्या प्रमाणात वाढ होईल.एकूण १ अब्जाहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नजरकैदेत जगाची लोकसंख्या आहे. चीन या तंत्रज्ञानाच्या बाबतीत सर्वात आघाडीवर असल्याची आकडेवारी उपलब्ध आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मनसेही विधानसभा लढवणार!

## राज ठाकरेंच्या शिलेदाराने सांगितली रणनीती

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीतून माघार घेतलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. जागावाटप आणि मतदारसंघातील पक्षबांधणीकरता पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या जात असून रणनीती आखली जात आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षमेळावा घेतला होता. या मेळाव्यात २०० ते २१५ जागा लढणार असल्याचं पदाधिकाऱ्यांना सांगितल्याचं मनसे नेते प्रकाश महाजन यांनी माध्यमांना आज सांगितलं. ते आज एबीपी माझाशी बोलत होते.**



राज ठाकरे यांनी आमच्या पक्षमेळाव्यात जाहीर केलं होतं की आम्ही २००-२१५ जागा लढवणार आहोत. राज ठाकरेंनी असा निर्णय घेतला असेल तर आम्ही कार्यकर्ते तयार आहोत", असं प्रकाश महाजन म्हणाले. मतदारसंघातील आढाव्यासाठी राज ठाकरेंनी प्रत्येक जिल्ह्यात निरिक्षक नेमले होते. त्यांचा अहवाल आल्यानंतरच राज ठाकरेंनी हा निर्णय घेतल्याचं प्रकाश महाजन म्हणाले.जातीय आरक्षणाला माझ्या पक्षाचा विरोध आहे. माझे नेते जात पात मानत नाहीत. आमचं म्हणणं आहे की जातीपेक्षा आर्थिक निकषावर आरक्षण असावं. पण समाजाच्या काही घटकाचे ते म्हणणं असेल तर हा प्रश्न सामोपचाराने सुटेल. मागे राज साहेबांनी सांगितलं होतं की सत्तेत असलेले आणि सत्तेत नसलेले या सगळ्यांना हे आरक्षण मान्य आहे तर अडलं कुठे?", असं प्रकाश महाजन म्हणाले. "मराठवाड्यातील असल्याने आमच्याकडे कासीम रिझवी नावाचा रझाकार होता. उद्धव ठाकरे हे महाराष्ट्रातील मुस्लिमांचे कासीम रिझवी आहेत. यांना मुसलमानांविषयी प्रचंड प्रेम आहे. मुसलमानांही यांच्याविषयी प्रेम आहे", असं म्हणत प्रकाश महाजन यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी राज ठाकरेंनी प्रचंड प्रयत्न केले. ते भाजपाबरोबर युती करून काही जागा लढवतील अशी अटकळ बांधली गेली. परंतु, ही अटकळ खोटी ठरली. कारण, त्यांनी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. परंतु, त्यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शवला होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत ते महायुतीतून लढणार की स्वबळाने निवडणूक लढवणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. परंतु, त्यांनी २००-२१५ जागा लढवण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यांना स्वबळावरच निवडणूक लढवावी लागेल, हे स्पष्ट आहे असं राजकीय वर्तुळात बोललं जातंय.राज ठाकरे यांनी आमच्या

### निवडणुकीसाठी कंबर कसली

परंतु, त्यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शवला होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत ते महायुतीतून लढणार की स्वबळाने निवडणूक लढवणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. परंतु, त्यांनी २००-२१५ जागा लढवण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यांना स्वबळावरच निवडणूक लढवावी लागेल, हे स्पष्ट आहे असं राजकीय वर्तुळात बोललं जातंय. लोकसभा निवडणुकीतून माघार घेतलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे.

पक्षमेळाव्यात जाहीर केलं होतं की आम्ही २००-२१५ जागा लढवणार आहोत. राज ठाकरेंनी असा निर्णय घेतला असेल तर आम्ही कार्यकर्ते तयार आहोत", असं प्रकाश महाजन म्हणाले. मतदारसंघातील आढाव्यासाठी राज ठाकरेंनी प्रत्येक जिल्ह्यात निरिक्षक नेमले होते. त्यांचा अहवाल आल्यानंतरच राज ठाकरेंनी हा निर्णय घेतल्याचं प्रकाश महाजन म्हणाले.जातीय आरक्षणाला माझ्या पक्षाचा विरोध आहे. माझे नेते जात पात मानत नाहीत. आमचं म्हणणं आहे की जातीपेक्षा आर्थिक निकषावर आरक्षण असावं. पण समाजाच्या काही घटकाचे ते म्हणणं असेल तर हा प्रश्न सामोपचाराने सुटेल. मागे राज साहेबांनी सांगितलं होतं की सत्तेत असलेले आणि सत्तेत नसलेले या सगळ्यांना हे आरक्षण मान्य आहे तर अडलं कुठे?", असं प्रकाश महाजन म्हणाले. "मराठवाड्यातील असल्याने आमच्याकडे कासीम रिझवी नावाचा रझाकार होता. उद्धव ठाकरे हे महाराष्ट्रातील मुस्लिमांचे कासीम रिझवी आहेत. यांना मुसलमानांविषयी प्रचंड प्रेम आहे. मुसलमानांही यांच्याविषयी प्रेम आहे", असं म्हणत प्रकाश महाजन यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी राज ठाकरेंनी प्रचंड प्रयत्न केले. ते भाजपाबरोबर युती करून काही जागा लढवतील अशी अटकळ बांधली गेली. परंतु, ही अटकळ खोटी ठरली. कारण, त्यांनी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला.

# अमित शाह यांना मराठा जात संपवायची आहे!

## रॅली काढून भुजबळ 100 टक्के दंगली घडवून आणणार : मनोज जरांगे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनोज जरांगेंनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून आंदोलन सुरु केलं आहे. या आंदोलनात त्यांनी काही महिन्यांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या आधी ते शांत झाले. मात्र लोकसभेत भाजपाला फटका बसला. त्यानंतर मनोज जरांगेंनी पुन्हा आंदोलन केलं.**



त्यांनी सरकारला सगेसोयऱ्यांच्या मागणीसह आरक्षण द्या अशी मागणी केली होती. त्यासाठी १३ जुलैपर्यंतचा अल्टिमेटम दिला होता. आता तो संपल्यावर त्यांनी पुन्हा उपोषण सुरु केलं आहे. तसंच देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्यावर गंभीर आरोप केला आहे.राज्यातील मराठा आरक्षणाचा प्रश्न जटील व गुंतागुंतीचा बनला असून भाजपाच्या अधिवेशनातही या प्रश्नावरुन खलबतं झाली आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केलं. त्यानंतर, आज राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मराठा-ओबीसी आरक्षणावर चर्चा केलीय. मात्र, अमित शाह यांनी आपल्या भाषणातून शरद पवार यांच्यावर टीका करताना मराठा आरक्षणाचाही संदर्भ दिला होता. आमच्याकडे रॅली काढून छगन भुजबळ १०० टक्के दंगली घडवून आणणार. मग, मी नाशिकमधील येवल्यात उपोषण सुरू केल्यावर, तुला किती वाईट वाटेल.

### शाह यांच्यावर जरांगेंचा गंभीर आरोप

अमित शाह आमच्या प्रश्नांकडे कशाला लक्ष घालतील? ते मोठे लोकं आहेत, त्यांना आमची गरज नाही. जे मोठे आहेत त्यांना हे धरुन राहणार आहेत. ते शिर्डीला आले तेव्हाच त्यांनी म्हटलं होतं तुम्ही लक्ष घाला ते काहीही बोलले नाहीत. लोकांचे मुडदे पाडणारे लोक आहेत, त्यांचा चेहरा माणसाचा आहे पण आतून कपटाने भरलेले लोक आहे. त्यांचं काही खरं नाही. ते गरीबाला कधीही मोठं करु शकत नाही. त्यांना देशातल्या मोठ्या जाती संपवायच्या आहेत. महाराष्ट्रात मराठा मोठी जात आहे ती संपवायची आहे, पटेल मोठी जात आहे ती संपवायची आहे.

# नेमप्लेट लावण्याच्या निर्णयाला स्थगिती!

## सर्वोच्च न्यायालयाचा उत्तर प्रदेश सरकारला धक्का

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशमध्ये कावड यात्रा मार्गावर असणाऱ्या हॉटेल किंवा खाद्यपदार्थांचे दुकान तसेच हातगाड्यांवर संबंधित मालकाचे नाव लिहिलेले फलक लावण्याचा निर्णय उत्तर प्रदेश सरकारने घेतला होता. या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचा निर्णय दिला आहे. कावड मार्गावर असणाऱ्या दुकानदारांना संबंधित मालकाचे नाव असलेले फलक लावण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. यावेळी दुकानदारांना त्यांची ओळख सांगण्याची आवश्यकता नाही, असं महत्वाचं निरीक्षणही यावेळी न्यायालयानं नोंदवलं आहे.**




उत्तर प्रदेश सरकारने काही दिवसांपूर्वी कावड मार्गावरील दुकान किंवा हातगाड्यांवर संबंधित मालकाचे नाव लिहिणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच राजकारण रंगलं होतं. कावड मार्गावरील दुकान किंवा हातगाड्यांवर संबंधित मालकाचे नाव लिहिण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत होती. पण उत्तर प्रदेश सरकार या निर्णयावर ठाम होतं. उत्तर प्रदेश सरकारने घेतलेल्या या निर्णयानंतर उत्तराखंड आणि मध्य प्रदेश सरकारने असा निर्णय घेण्यासंदर्भात पावलं उचलली होती. मात्र, आता उत्तर प्रदेश सरकारने घेतलेल्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स नावाच्या एका संस्थेने उत्तर प्रदेश सरकारच्या या निर्णयाच्याविरोधात २० जुलै रोजी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने (SUPREME COURT) उत्तर प्रदेश सरकारला मोठा धक्का देत कावड मार्गावर असलेल्या दुकानदारांना संबंधित मालकाचे नाव लिहिलेले फलक लावण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली.दरम्यान, उत्तर प्रदेश या राज्याबरोबरच उत्तराखंड आणि मध्य प्रदेश या दोन राज्यालाही यासंदर्भात नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणासंदर्भात आता येत्या शुक्रवारपर्यंत सविस्तर उत्तर सादर करण्याचे आदेश न्यायालयाने उत्तर प्रदेशसह उत्तराखंड आणि मध्य प्रदेश या राज्यांना दिले आहेत. याचबरोबर कावड यात्रा मार्गावर असलेल्या खाद्यपदार्थांच्या दुकानदारांना किंवा हॉटेल्स वाल्यांना त्यांची ओळख उघड करण्याची काहीही आवश्यकता नाही. त्यामुळे दुकान मालकांना त्यांची नावे लिहिण्याची गरज नाही. पण फक्त दुकानदारांनी खाद्यपदार्थाचा प्रकार म्हणजे दुकानामध्ये मांसाहारी पदार्थ किंवा शाकाहारी पदार्थ मिळतात की नाही? यासंदर्भात सांगणं महत्वाचं असल्याचं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं.उत्तर प्रदेश सरकारने काही दिवसांपूर्वी कावड मार्गावरील दुकान किंवा हातगाड्यांवर संबंधित मालकाचे नाव लिहिणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाच राजकारण रंगलं होतं. कावड मार्गावरील दुकान किंवा हातगाड्यांवर संबंधित मालकाचे नाव लिहिण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत होती. पण उत्तर प्रदेश सरकार या निर्णयावर ठाम होतं. उत्तर प्रदेश सरकारने घेतलेल्या या निर्णयानंतर उत्तराखंड आणि मध्य प्रदेश सरकारने असा निर्णय घेण्यासंदर्भात पावलं उचलली होती. मात्र, आता उत्तर प्रदेश सरकारने घेतलेल्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स नावाच्या एका संस्थेने उत्तर प्रदेश सरकारच्या या निर्णयाच्याविरोधात २० जुलै रोजी याचिका दाखल केली होती. फलक लावण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली.दरम्यान, उत्तर प्रदेश या राज्याबरोबरच उत्तराखंड आणि मध्य प्रदेश या दोन राज्यालाही यासंदर्भात नोटीस बजावण्यात आली आहे.

### न्यायालयाने काय निरीक्षण नोंदवलं?

या प्रकरणासंदर्भात आता येत्या शुक्रवारपर्यंत सविस्तर उत्तर सादर करण्याचे आदेश न्यायालयाने उत्तर प्रदेशसह उत्तराखंड आणि मध्य प्रदेश या राज्यांना दिले आहेत. याचबरोबर कावड यात्रा मार्गावर असलेल्या खाद्यपदार्थांच्या दुकानदारांना किंवा हॉटेल्स वाल्यांना त्यांची ओळख उघड करण्याची काहीही आवश्यकता नाही. त्यामुळे दुकान मालकांना त्यांची नावे लिहिण्याची गरज नाहीउत्तर प्रदेशमध्ये कावड यात्रा मार्गावर असणाऱ्या हॉटेल किंवा खाद्यपदार्थांचे दुकान तसेच हातगाड्यांवर संबंधित मालकाचे नाव लिहिलेले फलक लावण्याचा निर्णय उत्तर प्रदेश सरकारने घेतला होता. या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती.

# कमला हॅरिस जिंकण्याची शक्यता अधिक

## बायडेनपेक्षाही कमला हॅरिस यांची कामगिरी चांगली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेच्या आगामी राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात कमला हॅरिस यांचं आव्हान आहे. जो बायडेनपेक्षा कमला हॅरिस अधिक मजबूत असल्याचं नवं सर्वेक्षणही आता समोर आलं आहे. दरम्यान, बायडेन यांनी या निवणुकीतून माघार घेतल्यानंतर कमला हॅरीस यांच्या बाजूने समर्थन वाढलं आहे.**




बायडेन यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर केलेले सर्वेक्षण अद्याप जाहीर झालेले नसले तरीही आधीच्या सर्वेक्षणानुसार डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात बायडेनपेक्षाही कमला हॅरिस यांची कामगिरी किंचित चांगली आहे, असं वृत्त दि हिंदूने दिले आहे.देशव्यापी फॉक्स न्यूजच्या सर्वेक्षणात डोनाल्ड ट्रम्प हे मत दिलेल्या लोकांमध्ये जो बायडेन आणि कमला हॅरिस यांच्यापेक्षा फक्त एक गुण अधिक आघाडीवर आहेत. सर्वेक्षणानुसार ४९ टक्के मतं डोनाल्ड ट्रम्प, बायडेन यांना ४८ टक्के तर, कमला हॅरीसनाही ४८ टक्के समर्थन मिळालं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी जो बायडेन यांच्या प्रकृतीवरून टीका केली होती, तसंच यावरून त्यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्याविषयी नकारात्मक प्रतिक्रिया तयार झाली आहे. तसंच, काही सर्वेक्षणातून असं दिसून आलं आहे की कलमा हॅरीस या जो बायडेनपेक्षा १ किंवा २ गुणांनी किंचित पुढे आहेत. गेल्या आठवड्यात CBS/YOUGOV ने केलेल्या सर्वेक्षणानुसार, कमला हॅरीस आघाडीवर आहेत.

### बायडेन काम करण्यास अक्षम

ट्रम्प हॅरीसपेक्षा तीन गुणांनी (५१%-४८%) आणि बायडेन पाच गुणांनी (५२%-४७%) पुढे होते. जुलै इकॉनॉमिस्ट/YOUGOV पोलच्या सर्वेक्षणानुसार कमला हॅरीस या ट्रम्प यांच्याकडून काही गुणांनी पराभूत होऊ शकतात. या निवडणुकीत ४१ ते ४३ टक्क्यांनी वाईट कामगिरी करतील.अगदी अलीकडे, ट्रम्प यांच्या गोळीबाराच्या प्रयत्नानंतर केलेल्या रॉयटर्सच्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की बायडेन आणि हॅरीस हे ट्रम्प यांच्या बरोबर आहेत. परंतु, ६९ टक्के लोकांना असे वाटते की बायडेन यांचं वय झालं असून ते सरकारमध्ये आता काम करू शकत नाहीत.

# साथिया'च्या सेटवर हजारोंची गर्दी जमली अन् शेवटी पोलिसांनी

राणी मुखर्जी आणि विवेक ओबेरॉय यांची जोडी तब्बल २१ वर्षांपूर्वी 'साथिया' चित्रपटाच्या निमित्ताने जमली होती. राणीचे सलग काही चित्रपट फ्लॉप ठरल्याने विवेकबरोबरचा 'साथिया' तिच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला. चित्रपट प्रदर्शित झाल्यावर या दोघांच्याही अभिनयाचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. परंतु, प्रत्यक्षात या चित्रपटाचं शूटिंग करताना विवेकला अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. याविषयी त्याने नुकत्याच 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे. बॉलीवूडचा प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्माने विवेकला हा चित्रपट करू नकोस असा सल्ला दिला होता. याविषयी सांगताना अभिनेता म्हणाला, "साथिया चित्रपट करून नकोस असा सल्ला मला प्रत्येकाने दिला. 'तू ॲक्शन हिरो आहेस... प्रेमकथेत काम कसा करणार?' असं सगळेजण बोलत होते. माझे गुरू राम गोपाल वर्मा देखील माझ्यावर संतापले होते. पण, त्यांच्याकडून परवानगी मागण्यापेक्षा, त्यांची क्षमा मागून हा चित्रपट करेन असं मी ठरवलं होतं. मला




चित्रपटाची कथा खूपच आवडली होती. 'साथिया'चा दिग्दर्शक शाद अली माझा शाळकरी मित्र आहे. सुरुवातीला तो अभिषेकबरोबर चित्रपट बनवत होता परंतु, ते काही कारणास्तव शक्य झालं नाही."विवेक पुढे म्हणाला, "शादने मला त्याच्या घरी बोलावलं होतं. त्यावेळी आम्ही मणिरत्नमचा 'आलापयुथे' हा मूळ चित्रपट पाहिला. याच चित्रपटावर 'साथिया' आधारित आहे. तो चित्रपट पाहताना मी शादबरोबर काम करायचं ठरवलं. रेल्वे स्टेशनला शूटिंग करताना मी तिथेच बेंचवर झोपायचो कारण, तेव्हा आमच्याकडे बजेट नव्हतं. मला कोणीही ओळखत नव्हतं. माझ्याकडे मेकअप/व्हॅनिटी व्हॅन नसल्याने मी रेस्टॉरंटच्या स्वच्छतागृहात कपडे बदलायचो. आम्हाला एका दिवसात चार सीन शूट करायचे होते. त्यामुळे दिवसाला १८ ते २० तास मी काम केलं.""चित्रीकरण सुरू असताना आम्ही अनेकदा शूटिंगसाठी स्वतःचं सामान घेऊन जायचो. अशातच माझा पहिला चित्रपट 'कंपनी' प्रदर्शित झाला आणि माझं आयुष्य रातोरात बदलून गेलं.

## नवरा म्हणून माझ्यात काय कमी

बॉलीवूड अभिनेता आमिर खान मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणूनही ओळखला जातो. आमिर अभिनयाबरोबर त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतो. साल २००५ मध्ये आमिरने किरण रावबरोबर लग्नगाठ बांधली. मात्र, लग्नाच्या काही वर्षांतच २०२१ मध्ये दोघांनी घटस्फोट घेतला. आमिर व किरणच्या घटस्फोटाच्या निर्णयाने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. आता लग्नाच्या तीन वर्षांनंतर आमिरने घटस्फोटाबाबत भाष्य केले आहे. नुकतेच आमिर एबीपीच्या आयडिया ऑफ इंडिया समिटमध्ये सहभागी झाला होता. या मुलाखतीत त्याने त्याच्या करिअरबरोबर वैयक्तिक आयुष्याबाबतही अनेक खुलासे केले. दरम्यान, आमिरने या मुलाखतीत त्याच्या व किरणच्या घटस्फोटाबाबतही भाष्य केले.आमिर म्हणाला, "तुम्हा सर्वांना माहीत असेलच की, आमचा नुकताच घटस्फोट झाला आहे. एक दिवस मी संध्याकाळी बसलो होतो, तेव्हा मी किरणला म्हणालो की, नवरा म्हणून माझ्यात काय कमी होती? मी स्वतःमध्ये काय सुधारणा करू शकतो? आता मी आयुष्यात पुढे जात आहे. तर यावर नक्कीच विचार करेन." आमिरच्या या प्रश्नावर किरणने त्याला लिस्टच वाचून दाखवली. "किरण मला म्हणाली की, लिहून घे. तू खूप बोलतोस. तू दुसऱ्या कोणालाच बोलून देत नाहीस.

## रकुल-जॅकीचा जबरदस्त डान्स



अभिनेत्री रकुल प्रीत सिंग व अभिनेता जॅकी भगनानी यांनी २१ फेब्रुवारीला गोव्यात लग्नगाठ बांधली. गेल्या अनेक दिवसांपासून दोघांच्या लग्नाची चांगलीच चर्चा रंगली होती. अखेर दोघांनी लग्न करत नव्या आयुष्याला सुरुवात केली. दोघांच्या लग्नातील फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले होते. यावेळी लग्नातील दोघांच्या लूकची चांगलीच चर्चा रंगली. आता दोघांच्या संगीत कार्यक्रमातील फोटो समोर आले आहेत.रकुलने आपल्या इन्स्टाग्रामवर संगीत कार्यक्रमातील काही फोटो शेअर केले आहेत. एका फोटोत दोघे एकमेकांचा हात पकडून कार्यक्रमस्थळी येताना दिसत आहेत. तर दुसऱ्या फोटोत दोघे डान्स करताना दिसत आहेत. फोटोवरुन रकुल व जॅकीने संगीत कार्यक्रमात धमाकेदार डान्स केला असल्याचे दिसून येत आहे. सोशल मीडियावर हे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी या फोटोवर कमेंट केल्या आहेत.रकुल प्रीतने तिच्या संगीत कार्यक्रमासाठी प्रसिद्ध फॅशन डिझायनर फाल्गुनी पिकॉकने डिझाईन केलेला लेहेंगा परिधान केला होता. संगीतामध्ये, रकुलने पीच रंगाचा लेहेंगा घातला होता, ज्यावर एम्ब्रॉयडरी केली होती. तर गळ्यात रकुलने हिऱ्यांचा हार घातला होता. तर जॅकीने संगीत कार्यक्रमासाठी वेलवेटपासून बनवलेला गडद निळ्या रंगाचा सूट परिधान केला होता. या लूकमध्ये दोघेही खूपच सुंदर दिसत होते.रकुल व जॅकीने पंजाबी आणि सिंधी रीतीरिवाजानुसार लग्नगाठ बांधली. रकुल पंजाबी आहे. त्यामुळे दोघांचा विवाह पहिल्यांदा 'आनंद कारज' (पंजाबी रीतीरिवाज)नुसार झाला. तर जॅकी हा सिंधी कुटुंबातील असल्यामुळे पंजाबी पद्धतीने लग्न केल्यानंतर त्यांनी सिंधी पद्धतीने पुन्हा एकदा लग्न केले. लग्नानंतर दोघांनी पाहुण्यांसाठी पार्टीही आयोजित केली होती.

## 'भैय्याजी' आहे तरी कोण?

गेली अनेक दशकं बॉलीवूड अभिनेते मनोज बाजपेयी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आता लवकरच त्यांचा आणखी एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मनोज बाजपेयींच्या बॉलीवूड कारकीर्दीमधील हा १०० वा सिनेमा असणार आहे. त्यांच्या बहुचर्चित 'भैय्याजी' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यामध्ये प्रेक्षकांना जबरदस्त ॲक्शन पाहायला मिळणार आहे.'भैय्याजी'च्या ट्रेलरमध्ये सुरुवातीलाच एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला हा 'भैय्याजी' नेमका आहे तरी कोण? हे सांगत असतो. यानंतर मग ट्रेलरमध्ये मनोज बाजपेयींची एन्ट्री होती. या चित्रपटाचं संपूर्ण कथानक बिहारमधील एका गावाभोवती फिरतं. अपूर्व सिंग कार्की यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये मनोज बाजपेयी आपल्या कुटुंबाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी सज्ज झाल्याचं दाखवण्यात आलं आहे.भैय्याजीची ओळख करून देताना एक व्यक्ती ट्रेलरमध्ये सांगते, "भैय्याजी हे मास्टरमाईंड आहेत जे सरकार पाडून त्याच्याजागी विरोधकांना सत्तेवर आणून राजकारण पूर्णपणे फिरवू शकतात. त्यांनी अनेक पापी लोकांना शिक्षा केली आहे." "भैय्याजी रॉबिन हूड आहेत का?" असं विचारताच हा मनुष्य सांगतो, "आमचे भैय्याजी रॉबिन हूडचे पण बाबा आहेत." बाजपेयींसाठी हा सिनेमा अत्यंत खास आहे कारण हा त्यांचा १०० वा सिनेमा आहे. या सिनेमाचं आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे भैय्याजी चित्रपटाची निर्मिती त्यांच्या पत्नी करत आहेत. सुविंदर पाल विकीने या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारली आहे.

## शाहरुख खानकडे आहेत तब्बल 'एवढे' फोन



बॉलीवूड किंग शाहरुख खान नेहमी चर्चेत असतो. अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावर शाहरुख मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत तो चाहत्यांना अपडेट देत असतो. जगभरात शाहरुखचे लाखो चाहते आहेत. शाहरुखबद्दल प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यास चाहते नेहमीच उत्सुक असतात.शाहरुखने टेलिव्हिजनवरून करिअरला सुरुवात केली. मालिकेपासून चित्रपटांपर्यंतचा शाहरुखचा प्रवास म्हणावा तेवढा सोपा नव्हता. शाहरुखच्या कठीण काळात त्याला मदत केली ती निर्माते विवेक वासवानी यांनी. वासवानी यांनी शाहरुखला चित्रपटात केवळ लॉंचच केले नाही, तर संघर्षमय काळात त्याला आपल्या घरी राहण्यास जागाही दिली होती. एकेकाळी विवेक व शाहरुख खास मित्र मानले जायचे. अनेक किस्से सांगितले आहेत.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत विवेक यांनी शाहरुखबाबत अनेक खुलासे केले आहेत. ते म्हणाले, "शाहरुख आणि मी एकमेकांशी बोलतही नाही आणि भेटतही नाही. पण जेव्हा कधी आम्ही एकमेकांना भेटतो, तेव्हा आम्हाला आम्ही कालच भेटलो होतो.

# सरकारचा खेळाडूंवर 37.80 कोटी रुपये खर्च?

## ऑलिम्पिकमध्ये पदकं जिंकण्यासाठी कुस्तीपटू सज्ज!

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**ज्या खेळांमध्ये भारताला ऑलिम्पिकमध्ये सर्वाधिक यश मिळाले आहे, त्यात कुस्तीचाही समावेश आहे. भारताने कुस्तीमध्ये सात पदके जिंकली आहेत. गेल्या चार ऑलिम्पिकमध्ये भारताने या खेळात पदके जिंकली आहेत. त्यामुळेच यावेळीही कुस्तीपटूंकडून पदकांच्या अपेक्षा आहेत. भारतीय कुस्तीमध्ये गेल्या वर्षभरात अनेक वाद निर्माण झाले आहेत. भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष ब्रिजभूषण सिंग यांच्या विरोधात देशातील अव्वल कुस्तीपटू धरणे धरत बसले होते. निवड चाचणीबाबतही अनेक वाद झाले. एवढे करूनही भारताला सहा कोटा गाठण्यात यश आले. या सहा खेळाडूंवर भारत सरकारने किती पैस खर्च केले आहेत? जाणून घेऊया.**




पॅरिस ऑलिम्पिकसाठी कुस्तीसाठी एकूण ३७.८० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. तीन वर्षांत १९ राष्ट्रीय शिबिरांसह ६६ परदेश दौरेही आयोजित केले आहेत. या सायकलमध्ये १० अव्वल खेळाडू आणि १५ डेवलपमेंट रेसलर्सचा समावेश होता. यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतातील सहा कुस्तीपटू सहभागी होणार आहेत. यामध्ये पाच महिला कुस्तीपटू व एक पुरुष कुस्तीपटू सहभागी होणार आहे. भारतातील पाच महिला कुस्तीपटू देशाचे प्रतिनिधित्व करण्याची ही पहिलीच वेळ आहे. यावेळी कुस्तीपटूंना ऑलिम्पिक स्पर्धेतही सीडिंग देण्यात आले आहे. सीडेड खेळाडू प्राथमिक फेरीत एकमेकांसमोर येणार नाहीत. भारताकडून अंतिम पंघाल आणि अमन सेहरावत यांना सीड देण्यात आले आहे. सीडमुळे पंघालला चांगला ड्रॉ मिळाला आहे. तिला प्राथमिक फेरीत तिच्या श्रेणीतील अव्वल कुस्तीपटूंचा सामना करावा लागणार नाही. तर अंशू, निशा दहिया, रितिका हुडा आणि विनेश फोगट यांना सीडिंग दिलेले नाही.२९ वर्षीय विनेश फोगाटचे हे तिसरे ऑलिम्पिक आहे. यावेळी ती ५० किलो वजनी गटात आव्हान देईल. विनेशच्या प्रशिक्षणावर आतापर्यंत ७०.४५ लाख रुपये खर्च झाले आहेत.

हा पैसा त्यांचे परदेशी प्रशिक्षक, परदेशात प्रशिक्षण आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग यासाठी खर्च करण्यात आला आहे. विनेश गेल्या वर्षी आशियाई गेम्समध्ये खेळू शकली नव्हती. शस्त्रक्रियेनंतर तिने यावर्षी पुनरागमन केले असून आता ती ऑलिम्पिकला जाणार आहे.१९ वर्षीय अंतिम पंघालवर भारत सरकारने ६६.५५ लाख रुपये खर्च केले आहेत. अंतिम ५३ किलो वजनी गटात आव्हान सादर करेल. ती शेवटची अंडर-२० वर्ल्ड चॅम्पियन आहे. तिने सीनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदकही जिंकले आहे. भारताचा २० वर्षीय तरुण कुस्तीपटू अमन सेहरावतवर सरकारने ५६.५० लाख रुपये खर्च केले आहेत. अमन ५७ किलो वजनी गटात सहभागी होणार आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने या प्रकारात रौप्य पदक जिंकले होते. गतवर्षी सिनियर आशियाई चॅम्पियनशिपमध्ये त्याने सुवर्णपदक जिंकले होते. स्पर्धेत कांस्यपदक मिळवण्यातही तो यशस्वी ठरला होता.पॅरिस ऑलिम्पिकसाठी कुस्तीसाठी एकूण ३७.८० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. तीन वर्षात १९ राष्ट्रीय शिबिरांसह ६६ परदेश दौरेही आयोजित केले आहेत. या सायकलमध्ये १० अव्वल खेळाडू आणि १५ डेवलपमेंट रेसलर्सचा समावेश होता.

### दोन खेळाडूंना मिळाले आहे सीड

यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतातील सहा कुस्तीपटू सहभागी होणार आहेत. यामध्ये पाच महिला कुस्तीपटू व एक पुरुष कुस्तीपटू सहभागी होणार आहे. भारतातील पाच महिला कुस्तीपटू देशाचे प्रतिनिधित्व करण्याची ही पहिलीच वेळ आहे.यावेळी कुस्तीपटूंना ऑलिम्पिक स्पर्धेतही सीडिंग देण्यात आले आहे. सीडेड खेळाडू प्राथमिक फेरीत एकमेकांसमोर येणार नाहीत. भारताकडून अंतिम पंघाल आणि अमन सेहरावत यांना सीड देण्यात आले आहे. सीडमुळे पंघालला चांगला ड्रॉ मिळाला आहे. तिला प्राथमिक फेरीत तिच्या श्रेणीतील अव्वल कुस्तीपटूंचा सामना करावा लागणार नाही. तर अंशू, निशा दहिया, रितिका हुडा आणि विनेश फोगट यांना सीडिंग दिलेले नाही.२९ वर्षीय विनेश फोगाटचे हे तिसरे ऑलिम्पिक आहे. यावेळी ती ५० किलो वजनी गटात आव्हान देईल.

# जडेजाला टीम इंडियातून देण्यात आला डच्चू?

## निवडसमितीचे अध्यक्ष अजित आगरकरांनी सांगितलं कारण

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाला श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी टीम इंडियातून वगळण्यात आले आहे. रवींद्र जडेजाला एकदिवसीय संघातून अचानक वगळण्यात आल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन सामन्यांची वनडे मालिका २ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान कोलंबोमध्ये खेळवली जाईल. रवींद्र जडेजा, टी-२० आंतरराष्ट्रीय मधून निवृत्ती घेतल्यानंतर आता टीम इंडियासाठी फक्त कसोटी आणि एकदिवसीय फॉरमॅटसाठी उपलब्ध आहे.**






रवींद्र जडेजाची निवड न करण्यावर अजित आगरकर यांनी खुलासा केला आहे.सोमवारी मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत निवडसमितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी स्पष्ट केले की, रवींद्र जडेजाला एकदिवसीय संघातून वगळण्यात आलेले नाही. अजित आगरकर म्हणाले, “रवींद्र जडेजाला वनडे संघातून वगळण्यात आलेले नाही. एवढ्या छोट्या मालिकेसाठी त्याला आणि अक्षर पटेल दोघांनाही घेण्यात काही अर्थ नव्हता. आम्हाला माहित आहे की रवींद्र जडेजा कसा खेळाडू आहे?त्याने टी-२० विश्वचषकात चमकदार कामगिरी केली. त्याला वनडे संघातून वगळण्यात आलेले नाही.”अजित आगरकर म्हणाले,“आपल्यासाठी सर्व पर्याय खुले आहेत, पण जर रवींद्र जडेजाला अक्षर पटेलसह घेतले असते, तर तीनही सामने कोणत्याही एकाच खेळाडूने खेळले असते. आपल्या पुढे १० कसोटी सामने खेळायचे आहेत, ज्यामध्ये रवींद्र जडेजा बहुतेक सामने खेळणार आहे. त्यामुळे या तिन्ही सामने न खेळल्याने काही फरक पडत नाही.

### रोहित एकदिवसीय संघाचा कर्णधार

रवींद्र जडेजाला वगळण्यात आलेले नाही. तो अजूनही आमच्या रणनीतीमध्ये आहे आणि तो खूप महत्त्वाचा खेळाडू आहे.”२७ जुलैपासून श्रीलंकेविरुद्ध टी-२० मालिका सुरू होणार आहे. त्यानंतर २८ आणि ३० जुलैला आणखी दोन टी-२० सामने होतील. सर्व सामने पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवले जातील. यानंतर कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियमवर २, ४ आणि ७ ऑगस्ट रोजी एकदिवसीय सामने खेळवले जातील. टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधून निवृत्त झालेला रोहित शर्मा एकदिवसीय संघाचा कर्णधार असेल. टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाला श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी टीम इंडियातून वगळण्यात आले आहे. रवींद्र जडेजाला एकदिवसीय संघातून अचानक वगळण्यात आल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन सामन्यांची वनडे मालिका २ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान कोलंबोमध्ये खेळवली जाईल.